# मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर



## छत्रपति संभाजी

-प्रा. श. श्री. पुराणिक

# मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर

(१६८१–१७०७)

पूर्वार्ध

## छत्रपति संभाजी

(१६८०–१६८९)

लेखक

प्रा. श. श्री. पुराणिक

काळ प्रकाशन, पुणे

प्रथमावृत्ति १९८१; जून
मूल्य ३० रुपये

मुद्रक : प्रकाशक : शं. रा. दाते, काळ प्रकाशन; १८३५, सदाशिव, पुणे ३०.

मातृपितृचरणी

# प्रस्तावना

आठ वर्षांपूर्वी मी अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी पाहण्यास गेलो होतो. त्या वेळी वेरूळपासून दोन मैलांवर असलेल्या खुल्दाबादला गेलो आणि तेथे असलेली औरंगजेबाची कबर पाहिली. जिवंतपणी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत एकछत्री राज्य करणाऱ्या त्या शहेनशहाची ती कमालीची साधी आणि अनलंकृत कबर पाहून औरंगजेबाचा आपणा मराठ्यांशी उभा दावा असला तरी व्यक्ति या दृष्टीने तो किती अलौकिक माणूस होऊन गेला, असा विचार माझ्या मनात आला. त्या वेळी मला असेही वाटले की, रायगडावर छत्रपति शिवाजीमहाराजांची समाधि आहे आणि खुल्दाबादला औरंगजेबाची कबर आहे; या दोन टोकांना सांधणारा सत्ताबीस वर्षांचा म्हणजे १६८० ते १७०७ हा कालखंड, हा मराठ्यांच्या इतिहासातला पराकाष्ठेचा उज्ज्वल कालखंड आहे; त्यांचा आपण इतिहास लिहावा. यापूर्वीही ही कल्पना दहा बारा वर्षे मनात घोळत होतीच, पण इतके दिवस अबोध असलेल्या त्या कल्पनेला औरंगजेबाच्या कबरीच्या दर्शनाने आकार आला. ठिणगी पडावी तसे झाले. अशा प्रकारे जवळ जवळ दीड तपापूर्वी मनात पडलेल्या बीजाला अंकुर फुटले, वाचनाने व अभ्यासाने त्याचा वृक्ष झाला, त्या वृक्षाला आलेले फळ म्हणजे हा ग्रंथ होय.

मला इतिहास लिहावयाचा होता. कादंबरी लिहायची नव्हती. कादंबरी लिहिणे सोपे नाहीच, पण इतिहास लिहिणेही फार कठीण आहे. त्यामुळे या कालखंडावर जेवढे म्हणून ग्रंथ मला उपलब्ध झाले, ते सर्व मी कसोशीने अभ्यासिले. त्यांची यादी सोबत जोडलेली आहेच. या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत ऋणी आहे. माझ्या समजुतीप्रमाणे मी उपयोगात आणिलेल्या सर्व ग्रंथकारांची नावे दिली आहेत व समुच्चयाने त्यांचा ऋणनिर्देशही केलेला आहे. तरी मुद्दा कोणाचा उल्लेख चुकून राहिला असल्यास त्यांनी क्षमा करावी अशी विनंती येथेच करून ठेवितो. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या ' अहि–नकुल ' या कवितेतील चार कडवी मी वापरलेली आहेत. कारण औरंगजेबाचे पाशवी आक्रमण, मराठ्यांचा कडवा प्रतिकार व औरंगजेबाची दुर्दैवी अखेर, हे या संग्रामाचे टप्पे त्या कडव्यांतून उत्कृष्ट रीतीने व्यक्त होतात. अर्थात्, कविता लिहितांना कुसुमाग्रजांपुढे औरंगजेब व मराठे हा विषय नसावा, असलाच तर तो शोषक आणि शोषित असा असावा असा माझा तर्क आहे. पण आक्रमक व आक्रमणाचा प्रतिकार करणारे स्वातंत्र्यरक्षक यांचेही संबंध ' अहिनकुलवत् ' असल्यामुळे प्रस्तुत ' अहि–नकुल ' कविता औरंगजेब व मराठे यांच्याही संबंधांना लागू पडेल असे माझे मत आहे. या चार कडव्यांचा मला उपयोग करता आला याबद्दल मी कविवर्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत ग्रंथ लिहिताना ज्या ग्रंथकारांचा मला विशेष उपयोग झाला, त्यांच्यामध्ये श्री. सेतुमाधवराव पगडी यांचे नाव मूर्धस्थानी आहे. खाफीखान, साकी, मुस्तैदखान, भीमसेन सक्सेना, ईश्वरदास नागर यांच्या फारशी ग्रंथांच्या, आणि औरंगजेब दरबारच्या बातमीपत्रांच्या अनुवादाने, आणि ' महाराष्ट्र आणि मराठे ' यासारख्या स्वतंत्र लेखसंग्रहांनी श्री. सेतुमाधवराव यांनी मराठी-भाषिक इतिहासाच्या अभ्यासकावर खरोखर डोंगराएवढे उपकार करून ठेवले आहेत जे कार्य राजवाडे यांनी मराठी पत्रांच्या बाबतीत केले, ते सेतुमाधवराव यांनी फारशी इतिहास वाङ्‌मयाच्या बाबतीत केले, यात शंका नाही. त्याचप्रमाणे श्री. वा. सी. बेंद्रे यांचे 'संभाजी चरित्र' व 'राजाराम चरित्र' म्हणजे माहितीने गडगंज भरलेली भांडारे म्हटली पाहिजेत. संभाजीच्या चरित्राचा सम्यक् अभ्यास व मूल्यमापन करणारे डॉ. सौ. कमल गोखले यांचे 'शिवपुत्र संभाजी' हे पुस्तक म्हणजे शास्त्रीय पद्धतीने लिहिलेल्या ऐतिहासिक चरित्राचा उत्कृष्ट नमुना समजावा लागेल तीच गोष्ट प्रा. जयसिंगराव पवार यांच्या 'महाराणी ताराबाई' या चरित्रग्रंथाबद्दल. मराठीतले ताराबाईचे हे सुसंगत व ऐतिहासिक माहितीने भरलेले चरित्र पहिलेच म्हणावे लागेल. शेजवलकरांचा 'श्रीशिवछत्रपति' अपूर्ण असला तरी चिकित्सेच्या दृष्टीने अभ्यसनीय आहे. सरदेसाई आणि राजवाडे आणि सरकार या पूर्वसूरींप्रमाणे या उपरिनिर्दिष्ट ग्रंथकारांना 'वाट पुसल्याशिवाय' या कालखंडात एक पाऊल सुद्धा टाकता येणार नाही अशी वस्तुस्थिति आहे. हीच त्यांच्या ऋणाची पावती.

अर्थात, या थोर ग्रंथकारांची माहिती जरी मी घेतली, तरी त्यांचे निष्कर्ष मी घेतलेले नाहीत हे सांगण्याची जरूर आहे, असे नाही. कारण, इतिहासाच्या शास्त्रात निष्कर्षाचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे, इतकेच नव्हे तर त्याने स्वतंत्र बुद्धीने व तर्कशुद्ध पद्धतीने आपले मत मांडावे, अशीच अपेक्षा असते. बौद्धिक ऋण निराळे व बौद्धिक गुलामगिरी निराळी. म्हणून हे उदारात्मे माझ्यावर रुष्ट होणार नाहीत, अशी माझी अपेक्षा आहे. त्या दृष्टीने, शिवाजी-संभाजी संबंध, संभाजी व कविकलश यांचे संबंध, कविकलश, संभाजी व इतर मंत्री यांचे संबंध, या बाबतीत किंबहुना संभाजीच्या एकंदर मूल्यमापनाबाबतच मी थोडे वेगळे विचार व्यक्त केलेले आहेत. संभाजी हा दुरात्मा, दुराचारी, शिवाजीला न शोभणारा मुलगा, हा एक दृष्टिकोन आहे; तर संभाजी हा दुर्दैवाचा बळी, मंत्र्यांनी छळलेला, महाराष्ट्राचा उपेक्षित वीरपुरुष, असा दुसरा दृष्टिकोन आहे. या दोन्ही टोकांमध्ये सत्य आहे, असे मला वाटते. संभाजी हा दुर्दैवी असेल, उपेक्षितही असेल, पण त्याच्या दुर्दैवाला व उपेक्षेला काही प्रमाणात का होईना तो जबाबदार आहे आणि मंत्री म्हणजे केवळ दुष्ट दुर्जन नव्हेत, असे माझे मत आहे. संभाजीचे व्यक्तिमत्त्व फार गुंतागुंतीचे आहे. त्या वेळच्या अनेक घटना अद्याप

पूर्ण माहीत नाहीत. पण इतिहास म्हणजे सुटया घटनांची जंत्री नव्हे, त्या घटनांचा अन्वय लावण्याचा, त्यांची साखळी जोडण्याचा शक्य तितका तर्कशुद्ध प्रयत्न होय असे मला वाटते. त्या दृष्टीने संभाजीच्या चरित्राचे स्पष्टीकरण करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे इतकेच.

'ज्ञाताकडून अज्ञाताकडे' हा अनुमानाचा राजमार्ग आहे. या अनुमानाच्या साह्याने व 'प्रतिष्ठित' तर्काच्या आधारे घटनांचे अन्वयार्थ उलगडून सांगणे आणि इतिहासातील व्यक्तींच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे, एवढीच झाली तरी कोणाही इतिहासकाराची स्वतःची अशी म्हणता येण्यासारखी धनदौलत असते. या दृष्टीने विचार केला म्हणजे इतिहासकाराला शास्त्रज्ञाच्या तर्कशक्तीप्रमाणे कादंबरीकाराची ऐतिहासिक कल्पनाशक्ति Historical Imagination सुद्धा आवश्यक असते, असे म्हणणे भाग आहे. कारण, इतिहास म्हणजे गेलेल्या काळाची व मेलेल्या माणसांची कथा असली, तरी एके काळी तो काळ वर्तमानकाळ होता, आणि ती माणसे जिवंत होती, खलबते करीत होती, लढत होती, भांडत होती, हसत होती, रडत होती, बोलत होती, चालत होती, या गोष्टीचा इतिहासकाराला विसर पडता कामा नये. इतिहास हा तसा फार जुना नसतो. कालचे राजकारण हा आजचा इतिहास असतो व आजचे राजकारण हा उद्याचा इतिहास असतो. माणसाचे बाह्य रंगरूप बदलले, तरी रागद्वेष तेच असतात. म्हणूनच वर्तमानकाळाची मुळे ही भूतकाळात दडलेली असतात — 'The roots of present are imbedded in past' आणि इतिहास म्हणजे भूतकाळचे राजकारण History is past politics' असे म्हटले जाते. ते आपण आहोत व आपण तेच आहोत. एक आधी जन्मला म्हणून पूर्वज व एक मागून जन्मला म्हणून वंशज इतकाच फरक.

इतिहासकाराला जर अंतःकरण असेल, जर तो सहृदय असेल, जर एकाच वेळी तो तटस्थही राहू शकत असेल, व तद्रूपही होऊ शकत असेल, जर त्याच्यापाशी ही ऐतिहासिक कल्पना शक्ति असेल, जर त्याला प्रतिभेच्या जोरावर परकायाप्रवेशाची विद्या येत असेल तर या Imaginative Sensibility किंवा Sympathetic imagination—सहानुभावजन्य कल्पना शक्तीच्या साहाय्याने तो स्थळकाळाचे अंतर तोडील आणि त्या मेलेल्या माणसांच्या शरीरांत प्राण फुंकील आणि त्यांना सजीव करील. त्याला त्यांचे गुणच दिसणार नाहीत तर दोषही दिसतील, दोषच दिसणार नाहीत तर गुणही दिसतील. त्याला मोठयांचा लहानपणा दिसेल, लहानांचा मोठेपणा दिसेल; शहाण्यांचा वेडेपणा दिसेल, वेडयांचा शहाणपणा दिसेल; स्वजनांचा क्षुद्रपणा दिसेल आणि शत्रूची उत्तुंगता दिसेल; त्याला यशातले अपयश दिसेल आणि अपयशातले यश दिसेल. ही भूतकाळातील व्यक्तिरेखांची पुर्ननिर्मिति होच

इतिहासातली कला होय; केवळ उपमालंकारांची आतषबाजी म्हणजे कला नव्हे.

आपला समाज हा अत्यंत व्यक्तिनिष्ठ आहे. त्या दृष्टीने तर याचे महत्त्व विशेषच आहे. एखादा शिवाजी, एखादा संभाजी, एखादा औरंगजेब, एखादे टिळक व एखादे गांधी या राष्ट्राला गति देतात. लहान व मोठ्या व्यक्तींच्या रागद्वेषाच्या गुंतागुंतीतून इतिहासातील घटनांची निर्मिति होते म्हणून प्रामाणिक व्यक्तिदर्शन व यथार्थ मूल्यमापन हे इतिहासाचे प्रधान अंग समजले पाहिजे. इतिहासकाराला शत्रुमित्र कोणी नसतात. कारण त्याला इतिहास प्रस्तुतासाठी राबवायचा नसतो, त्याने संभाजीचा दोषही सांगितला पाहिजे व औरंगजेबाचा गुणही सांगितला पाहिजे. हे इतिहासाचे शास्त्र आहे व ही इतिहासाची कला आहे, अशी माझी समजूत आहे. अर्थात् माझा हा प्रयत्न म्हणजे पूर्णपणे सिद्धीस गेलेला आहे असा दावा मला दूरान्वयाने मुद्दा करावयाचा नाही. पण माझ्या प्रयत्नांची दिशा कोणती आहे हे कळण्याच्या दृष्टीने माझ्या इतिहासविषयक कल्पनेचे हे दिग्दर्शन केले इतकेच. अशा प्रकारच्या इतिहासाला लालित्याचे व कलेचे वावडे तर नाहीच नाही, उलट त्यामुळे 'अधिकस्याधिकं फलम् ।' या न्यायाने इतिहासाची गुणवत्ता अनेक पटींनी वाढेल असे माझे मत आहे.

अर्थात्, अशा प्रकारे तिहास लिहावा की नाही, हा मोठा प्रश्न आहे. इतकेच नव्हे तर कलेच्या संपर्काने इतिहासाची प्रतिष्ठा ढळेल, व धड ती कादंबरीही होणार नाही, व तो धड इतिहासही होणार नाही. म्हणून इतिहास हा शास्त्र म्हणूनच लिहिला पाहिजे, असे म्हणणारे पंडित आहेत यांची मला जाणीव आहे व मला त्यांच्याबद्दल आदर आहे. तरीसुद्धा अखेर या प्रश्नाचे उत्तर ज्याने त्याने स्वतःच्या अंतःकरणप्रवृत्तीला शरण जाऊन ठरविण्याशिवाय गत्यंतर नाही. त्या बाबतीत माझे मत मी सांगितलेच. हा वाद जुनाच आहे. त्या संदर्भात प्रसिद्ध चरित्रकार लिटन स्ट्रॅची याचा उतारा वाचण्यासारखा आहे. गिबनवरच्या आपल्या लेखात स्ट्रॅची म्हणतो—

That the question has ever been not only asked but seriously debated, whether history was an art, is certainly one of the curiosities of human ineptitude. What else can it be ? It is obvious that history is not a science. It is obvious that history is not accumulation of facts, but the relation of them. Only the pedantry of incomplete academic persons could have given birth to such a monstrous supposition. Facts relating to the past, when they are collected without art, are compilations; and compilations may no doubt be useful but they are no more history

than butter, eggs, salt, and herbs are an omlette. That Gibbon was a great artist is implied in the statement that he was a great historian.

('इतिहास ही कला आहे की काय,' हा प्रश्न केवळ विचारला गेलेला नाही, तर गंभीरपणाने त्याच्यावर चर्चा करण्यात आलेली आहे, ही गोष्ट मानवी बुद्धीच्या विसंगतीचे एक विलक्षण उदाहरण म्हणावे लागेल. इतिहास कला नाही तर दुसरे काय ? इतिहास हे शास्त्र नाही, हे उघडच आहे. इतिहास ही घटनांची जंत्री नाही तर घटनांचे निवेदन आहे हेही उघडच आहे. ही विलक्षण कल्पना म्हणजे अर्ध्याकच्च्या पंडितांच्या पढिकपणाचा परिपाक म्हटला पाहिजे. कलाहीन रीतीने जमविलेल्या भूतकालीन घटना म्हणजे संकलन होय; आणि संकलन उपयुक्त असतेच; पण ज्याप्रमाणे लोणी, अंडी, मीठ व कोथिंबीर म्हणजे, आम्लेट नसते, त्याप्रमाणे संकलन म्हणजे इतिहास नसतो. गिबनला मोठा इतिहासकार म्हटला म्हणजे तो मोठा कलावंत होता, हे मुळे आपोआपच निष्पन्न होते.)

इंग्रजीमध्ये अशा प्रकारचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मेकॉलेने केला हे प्रसिद्धच आहे. पण मेकॉलेचा इतिहास चित्रमय व रंजक असला तरी चिंतनशीलता त्यात कमी आहे असे पंडितांचे मत आहे. कार्लाईलच्या 'फ्रेंच रेव्होल्यूशन'मध्ये काव्य आहे, चित्रमयता आहे व चिंतनशीलता आहे, पण मेकॉलेप्रमाणे त्याची शैली प्रसादपूर्ण नाही. हे सर्व गुण इतिहासकारांचा मुकुटमणी असलेल्या गिबनमध्ये जवळ जवळ पूर्णावस्थेस गेले आहेत, तरीही त्याच्यात भावनोत्कटता कमी आहे असा आक्षेप आहेच. मराठीमध्ये सावरकरांचा 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ शास्त्र व कला या दोन्ही दृष्टींनी वैशिष्टयपूर्ण आहे. दुसरा असाच सुंदर ग्रंथ म्हणजे वि. गं. लेले यांचा 'शिवशाहीचा अस्त' हा होय.

लिटन स्ट्रॅची ज्या वेळी लिहीत होता त्याच वेळी महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे लिहीत होते. त्यांचीही इतिहासाबद्दलची कल्पना मुद्दाम देत आहे. या उद्देशाने की, कलात्मक इतिहासाची कल्पना ही पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे सारखीच असू शकते. बाकी चांगली कल्पना पाश्चात्यांची असली म्हणजे ती वाईट होते असे थोडेच आहे ! भावे म्हणतात—

'इतिहासाच्या योगे त्यांच्या दृष्टीला नवीन किरण दिसू लागतील. महाराष्ट्रातील डोंगर आणि नद्या, मैदाने आणि किल्ले त्यांच्याशी बोलू लागतील आणि या अचेतन सृष्टीची भाषा त्यांच्यात चैतन्य खेळवील, व परलोकात गेलेले पूर्वज त्यांच्याशी पुन्हा पुन्हा संभाषण करू लागतील; चित्त उदास झाले असता त्यांचे पूर्वज ते उल्हसित करतील; मन हताश झाले तर ते त्यास धीर देतील; आणि कार्यविन्मुख होऊन चिंताग्रस्त झालेल्याना कार्यक्षम करून त्यांच्यात पुन्हा नवी तरतरी आणतील यात संशय नाही. ही जादू, ही जागृतोची करामत महा-

राष्ट्राच्या इतिहासात पूर्णपणे भरलेली आहे. या इतिहासरसायनाचा हा चैतन्य गुण घालवून, त्याचा निःसत्व, निर्जीव, शिथिल, निर्विकार व बेचव चोथा बनविण्याकरिता परकीयांनी जे श्रम घेतले, व जे द्रव्य खर्च केले त्याचे शतांश श्रम व द्रव्य आपण खर्ची घातले तर निःसंशय शक्तिवर्धक व स्वातंत्र्यदायक असे सुंदर ऐतिहासिक रसायन आपण निर्माण करू शकू.'

पण इतिहास ही कला असली, तरी ती 'कलेसाठी कला' नसून 'जीवनासाठी कला' आहे. इतिहासकार हा भूतकाळच्या शिळ्या स्वप्नांच्या धुंदीत झिंगून जाणारा कमलभक्षक उमरखय्याम नसून, भूतकालाच्या घटनांच्या मननाने मुनि आणि राष्ट्राच्या आत्म्याच्या दर्शनाने ऋषि झालेला द्रष्टा आहे – इतिहासाचा उद्देश रंजन नसून प्रबोधन हा आहे. पण इतर सर्व कलांप्रमाणे इतिहासाच्या कलेच्याही बाबतीत बोध हे कारण नसून कार्य आहे. म्हणजे, लोकांना जागे करावे म्हणून सूर्य उगवत नाही, सूर्य उगवला म्हणजे लोक जागे होतात, परिमळ द्यावा म्हणून फूल फुलत नाही, फूल फुलले म्हणजे आपोआप परिमळ दरवळतो, त्याप्रमाणे बोध करावा म्हणून इतिहास लिहिला जात नाही, इतिहास लिहिला म्हणजे त्यातून आपोआप प्रबोधन होते. आता प्रश्न असा आहे की, बोध हे जर इतिहासाचे कार्य असेल, तर हिंदुस्थानच्या विशेषतः मराठ्यांच्या इतिहासापासून कोणता बरे बोध घेता येण्यासारखा आहे? यादवांच्या वेळी मराठ्यांचे स्वराज्य होते. अलाउद्दिनाने त्यांना गुलाम केले. शिवाजी महाराजांनी स्वतंत्र केले. इंग्रजांनी त्यांना परतंत्र केले. आज ते परत स्वराज्यात आहेत. स्वराज्य कसे मिळते हे शिवछत्रपतींचा काळ दाखवतो. स्वराज्य कसे राखता येते हे त्याचे स्वातंत्र्ययुद्ध दाखवते स्वराज्य वाढते कसे हे पेशवाई दाखवते व स्वराज्य जाते कसे हे दुसऱ्या बाजीरावाचा काळ दाखवतो असे स्थूलमानाने म्हणता येईल. आज आपण स्वराज्याचे सुख भोगीत आहोत. त्या दृष्टीने अनेक वेळा स्वराज्य आणि पारतंत्र्य भोगलेल्या मराठ्यांचा इतिहास फारच बोधप्रद आहे. त्यांच्या इतिहासातून कोणता बोध निष्पन्न होतो?

प्रश्न तर मोठा गहन आहे. त्याचे उत्तर माझ्यासारख्याने देणे हे केवळ धाष्टर्य आहे त्यापेक्षा ज्या थोर इतिहासकाराने छत्तीस वर्षांच्या मराठ्यांच्या इतिहासाच्या तपश्चर्येने ऋषिपदवी प्राप्त करून घेतली त्या वासुदेवशास्त्री खऱ्यांच्याच शब्दात ते उत्तर देतो. १९१८ साली मराठशाहीचे शंभरावे श्राद्ध न. चिं. केळकरांनी 'मराठे व इंग्रज' हा ग्रंथ लिहून केले त्याला खरेशास्त्र्यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्या प्रस्तावनेत त्यांनी मराठी राज्य बुडण्याची मीमांसा केलेली आहे. राजवाड्यांच्या पहिल्या खंडाची प्रस्तावना, शेजवलकरांची नानासाहेब पेशव्यांच्या चरित्राची प्रस्तावना, त्याप्रमाणे खरेशास्त्र्यांची ही प्रस्तावना मराठी वाङ्मयात चिरंतन महत्त्वाची आहे. विशेषतः पुढे दिलेला त्यातला शेवटचा परि-

च्छेद वाचला म्हणजे इतिहासकार केवढा द्रष्टा असू शकतो याची प्रतीति आल्याशिवाय राहत नाही. उतारा काहीसा मोठा असला तरी महत्त्वाचा आहे आणि विशेषत: स्वतंत्र भारताच्या प्रत्येक नागरिकाने तर तो पाठ करण्यासारखा आहे.

'आमचा पुणे–सातारा इंग्रजांनी कां घेतला आणि त्यांचा मद्रास–कलकत्ता आम्ही कां घेऊ शकलो नाही, याचा संक्षेपाने येथपर्यंत विचार केला. देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगां जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झालेले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेलो भांडी एकमेकांवर आदळली असता, त्यातले कोणते फुटावयाचे, मातीचे की लोखंडाचे, हे ठरलेलेच आहे! हल्लीचा काळ असा आला आहे कां, आम्ही पाश्चात्यांची बरोबरी तरी करावो, नाही तर त्यांचे मजूर तरी होऊन राहावे, राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टीत हीच स्थिति आहे. जर आम्हांस पाश्चात्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल, तर या लेखात वर्णिलेले आमचे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होते ते याच दुर्गुणांमुळे गेले, हे समजून जर आम्ही सावध झालो नाही तर, नवीन स्वराज्य मिळून सुद्धा व्यर्थच आहे, हाच इतिहास–डिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानी घुमत राहिला पाहिजे!'

हा इतिहासाचा बोध आहे, हे इतिहासाचे शास्त्र आहे, ही इतिहासाची कला आहे.

राजस्थान आणि कर्नाटक वगळता हिंदुस्थानात इतर कोणत्याही प्रांताला न लाभलेली, शालिवाहनापासून झाशीच्या राणीपर्यंत हजार वर्षांची उज्ज्वल इतिहासाची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. महाराष्ट्र हे इतिहासदेवतेचे निवासस्थान आहे. आपल्या ओजस्वी इतिहासाची व इतिहास पुरुषाची महाराष्ट्राला कितपत अभिरुचि आहे?

राजगडची शिवाजी महाराजांची सदर पडून गेलेली आहे. कर्नाटकात होदिगिरी । शहाजीराजांच्या समाधीच्या आसपास डुकरे घोटाळत आहेत. त्यांचे फोटोच श्रीधर तेलकर यांनी आपल्या शहाजी चरित्रांत छापले आहेत. जिज्ञासूंनी ते पहावेत आणि शंकासमाधान करून घ्यावे. पन्हाळ्याला रामचंद्रपंत अमात्याची समाधि कष्टाने शोधावी लागते, मेणवलीला नाना फडणिसाच्या वाड्यात गवत वाढते आहे.

नेपोलियनवर एक लाख पुस्तके आहेत, तरी दरवर्षी नवी पुस्तके लिहिली जातच आहेत. शिवछत्रपतीवर मोजून शंभर चरित्रे तरी असतील की नाही याची

शंका आहे. – केळुसकर, सरदेसाई, पुरंदरे, पगडी, कवडे, बेंद्रे, हरदास, गोखले– संपली लेखकांची श्रेयनामावली. नाना फडणिसाचे एक चरित्र नव्वद वर्षांपूर्वी खरेशास्त्र्यांनी लिहिले तेवढेच. सखाराम बापूंवर एक (कानिटकर). राघोबावर एक (सुंठणकर). महादजी शिंद्यांवर एक (नातू), संभाजीवर तीन (वाघट बेंद्रे. सौ. गोखले), थोरल्या बाजीरावावर तीन (वापट, बेहेरे, दीक्षित), नाना साहेबावर एक (सरदेसाई), राजारामावर एक (बेंद्रे), थोरल्या माधवरावावर एक (सहस्रबुद्धे) अशी ठळक ग्रंथनिष्पत्ति आहे. ज्या विषयावर प्रस्तुत ग्रंथ आहे त्यावर मराठीत 'हिंदवी स्वराज्य आणि मोगल' एवढे एकच पुस्तक आहे. ज्यांनी हाडाची काडे करून इतिहास रचले, त्यांची नांवे विसरली जात आहेत हातातोंडाशी आलेला एकुलता एक मुलगा वार्धक्यात मृत्यु पावल्यावर इतिहासालाच मुलगा मानणारे सरदेसाई ! समईच्या उजेडात चार लाख पत्रे वाचणारे खरेशास्त्री ! कोकणच्या दऱ्याखोऱ्यात कागदपत्रे मिळवण्यासाठी पायपीट करणारे आवळसकर ! मधुमेहाने चक्कर येत असतानाही शिवचरित्र लिहिणारे शेजवलकर! रक्तदाब व मधुमेह यांच्याशी झुंजत इतिहास लिहिणारे गोव्याचे पिसुर्लेकर! पुरंदरे दप्तर प्रसिद्ध करणारे पुरंदरे मास्तर ! मूठभर अभ्यासक सोडले तर बहुजनांच्या कानापर्यंत यांची नावे तरी गेली असतील की नाही याचीच वानवा !

ज्या शिवाजीने महाराष्ट्राला 'महाराष्ट्र' केले, त्या शिवाजीचे चित्रपट त्यांच्या महाराष्ट्रात चालू शकत नाहीत. 'सिंहगड' 'प्रतापगड' 'पावनखिंड' 'राजा शिवछत्रपति' हे शिवाजीचे चित्रपट शिवाजीच्या छाप्याप्रमाणेच केव्हा येतात व जातात हे कळतही नाही. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धावर 'धन्य ते संताजी धनाजी' 'महाराणी येसूबाई' हे फक्त दोन चित्रपट मराठीत आहेत. त्या संताजी धनाजी प्रमाणे त्यांचे चित्रपटही आता इतिहसजमा झालेले आहेत.

रॉकेलपासून फॅशनपर्यंत सर्वच वस्तु ज्यांच्याकडून आपण उसन्या आणतो, त्या इंग्लड अमेरिकेकडून इतिहासाची उपेक्षा करण्याची ही 'फॅशन' आपण उसनी घेतलेली नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. बाकी इतर कोणत्या बाबतीत असो को नसो, या एका बाबतीत मात्र आपण अगदी 'स्वयंपूर्ण' आहोत. कारण इतिहास जपण्याच्या बाबतीत प्रतिगामी म्हणण्याइतके ते लोक जागरूक आहेत. अजून त्यांच्याकडे नेपोलियनवरचे, किंवा दोनशे वर्षांपूर्वीच्या फ्रेंच राज्यक्रांतीवरचे चित्रपट चालतात. अजून ते स्कॉटलंडमध्ये जुने किल्ले दुरुस्त करतात. अजून ते त्यांच्या शेक्सपीअरची खुर्ची आणि त्यांच्या डिकन्सची शाईची दौत आणि त्यांच्या कार्लाईलचा सोफा वर्षामागून वर्षे गेली तरी जपून ठेवतात. त्यांनी त्यांचा इतिहास तर जपलाच, पण आपलाही जपला. आपल्या मराठ्यांचा पहिला इतिहासकार ग्रँट डफ हा इंग्रज होता तो अकरा हजार रुपयांना बुडाला पण त्याने मराठ्यांचा इतिहास प्रसिद्ध केला. आपल्या पेशव्यांचे दोन कोटी कागदपत्रांचे दप्तर इंग्रजांनी

जपून ठेविले. आपले शिवाजी-तानाजीचे पोवाडे गोळा करून प्रसिद्ध केले शाळिग्राम नावाच्या शिक्षकाच्या मदतोने, ऑक्वर्थसाहेबाने !

तेव्हा इतिहासाबद्दल आपला जो सध्या 'स्वतंत्र' दृष्टिकोन आहे त्या बाबतीत आपण कोणाचेही ऋणी नाहीत हे उघड आहे. पण केलेल्या कर्माचे फळ चुकत नाही हा इतिहासाचा दंडक इतिहासाच्या उपेक्षेलाही लागू आहे. राजवाडे यांनी म्हटले आहे की, 'विष हे जाणून खा की नेणून खा, त्याचा परिणाम होणारच.' त्याच न्यायाने एक इंग्रज ग्रंथकार म्हणतो – 'The nation that does not know its history is fated to repeat it-' ज्या राष्ट्राला आपला इतिहास माहीत नसतो, त्या राष्ट्राच्या कपाळी इतिहासाचो पुनरावृत्ति लिहिलेली असते.

१९२८ साली वि. ल. भावे यांनी ऐतिहासिक ग्रंथांची महाराष्ट्राला कितपत अभिरुचि आहे याबद्दल लिहिले की 'आपल्या पूर्वजांचे पराक्रम ऐकण्याची हौस महाराष्ट्राला थोडीफार आहे, पण त्यासाठी काही द्रव्य खर्चावे व पदराला चट्टा लावून घ्यावा ही इच्छा महाराष्ट्राची दिसत नाही.' 'इतिहास व ऐतिहासिक' सारख्या मासिकाला पुरे दोनशे वर्गणीदारही मिळू नयेत, 'रामदास रामदासी' तोटा खाऊन चालविणे भाग पडावे, 'ऐतिहासिक लेखसंग्रहा'च्या संपादकाला माराकुटीने तोंडमिळवणी करता यावी व स्वतःच्या उदारनिर्वाहासाठी नाटके लिहिण्याची पाळी यावी या गोष्टी शरमेच्या आहेत....आपल्या पूर्वजांनी स्वतंत्रतेसाठी काय हाल सोसले, किती यत्न केले व कसे पराक्रम केले हे जाणण्यासाठी जो दमडी खर्च इच्छीत नाही त्या पाप्याच्या वंशजांना स्वतंत्रता कोठून मिळेल ? ' 'त्यानंतर चोवीस वर्षांनी १९४६ साली पानिपत'च्या प्रस्तावनेत शेजवलकरांनी उद्‌गार काढले की, 'महाराष्ट्रात आज काळ असा आला आहे की इतिहासाचे पुस्तक प्रसिद्ध झाले तर त्यावर दोन ओळी लिहिणारा शोधून काढावा लागतो, व त्याची आर्जव करावो लागते.' जी गोष्ट शेजवलकरांची तीच सरदेसायांची. त्यांनी उभी हयात रियासती लिहिण्यात खर्च केली. स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर रियासतीचे चरित्रात्मक नवे खंड लिहिण्याचा उद्योग त्यांनी नव्वदीत सुरू केला त्यांना प्रकाशक मिळेनात. १९५५ च्या जून महिन्यात माडखोलकरांना त्यांनी खेदाने लिहिले की, 'इतउत्तर रियासतीचे भाग प्रकाशक छापतील असे दिसत नाही. समाधान हे की झाले ते काम केले.' समाधान एवढेच. अलीकडे ढवळे प्रकाशनाने रियासतीची पुनरावृत्ति काढण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे हे आवर्जून सांगितले पाहिजे. पण मुख्य मुद्द्याला त्यामुळे बाध येत नाही. सरदेसायांनी लिहिले त्यालाही आता जवळजवळ पंचतीस वर्षे होत आली. या काळात क्रमिक पुस्तकांचा व्यवहारही प्रकाशकांच्या हातातून गेलेला असल्यामुळे त्यांची स्थिति ऐतिहासिक ग्रंथांच्या प्रकाशनाच्या बाबतीत किती कठीण झाली असेल याची कल्पनाच केली पाहिजे. आर्यभूषण आणि चित्रशाळा या दोन छापखान्यांनी हरिभाऊ आपटे व

शिवरामपंत परांजपे, विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक, खाडिलकर आणि राजवाडे या स्वातंत्र्यभक्तांचे ओजस्वी वाङ्मय प्रसिद्ध केले. पारतंत्र्यात ते शंभर वर्षे टिकले. आज स्वराज्यात ते बंद पडलेले आहेत ! छापखान्यांची अवस्था अशी झाली, तेथे प्रकाशनाच्या व्यवसायाबद्दल काय बोलावे !

अशा प्रतिकूल परिस्थितीत इतिहासावरचा ग्रंथ प्रसिद्ध करू पाहणाऱ्या प्रकाशकाचे धाडस सामान्य म्हणता येणार नाही. त्या इतिहासग्रंथांत वर्णन केलेल्या वीरपुरुषांचीच उपमा त्याला शोभू शकेल. ज्यांना श्री. शंकरराव दाते यांच्या कार्याची जवळून माहिती आहे, त्यांना या वर्णनात अतिशयोक्ति वाटणार नाही असे मला वाटते. कारण गेली साठ वर्षे, राजकीय, सामाजिक व धार्मिक आघाड्यावर प्रतिकूल प्रवृत्तीशी ज्या निर्भय आणि तत्त्वनिष्ठ वृत्तीने ते झुंजत आहेत ते पाहिले, म्हणजे ही उपमा किती समर्पक आहे हे सहज लक्षात येईल. त्यांच्यासारख्या टिळकांपासून इंदिरा गांधींपर्यंतचा काळ पाहिलेल्या, सावरकर, मुंजे अणे, भोपटकर, केळकर, माटे, मोरारजी देसाई यांच्याशी परिचय असलेल्या, परिणतप्रज्ञ विचारवंताच्या पसंतीला, प्रसिद्ध होण्यापूर्वीच हा ग्रंथ उतरला तेव्हा माझ्या श्रमांचे सार्थक झाल्यासारखे मला वाटले. त्यांच्यासारखा प्रकाशक मिळाला हे माझ्यापेक्षा माझ्या ग्रंथाचे भाग्य म्हटले पाहिजे. हा ग्रंथ इतक्या शुद्ध स्वरूपात छापून प्रसिद्ध होत आहे याचे सारे श्रेय श्री. शंकरराव दाते, त्यांचे चिरंजीव व त्यांचे काळ मुद्रणालयातील सर्व सहकारी यांच्या परिश्रमांना आहे. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथासाठी मी वापरलेली अनेक पुस्तके आमच्या चाळिसगावच्या आर्टस् कॉमर्स व सायन्स कॉलेजच्या ग्रंथालयातून उपलब्ध झाली. काही पुस्तके येथील ना. वं. वाचनालयातून मिळाली. ताराबाईकालीन कागदपत्रे हा ग्रंथ येथील आ. बं. हायस्कूलच्या ग्रंथालयातून श्री. भय्यासाहेब अडावदकर यांनी उपलब्ध करून दिला. या सर्व संस्थांच्या अधिकारीवर्गाचा व सेवकवर्गाचा मी आभारी आहे. त्याच प्रमाणे श्री. भय्यासाहेब अडावदकर यांचाही मी आभारी आहे. या ग्रंथात वर्णन केलेल्या संभाजीच्या समकालीन चित्रांची माहिती मला 'नगरजिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाचे अध्यक्ष श्री जोशी यांच्याकडून मिळाली. त्याचप्रमाणे त्यांच्याशी केलेल्या चर्चेचाही मला फार उपयोग झाला. त्यांचे ऋण मी येथे आनंदाने नमूद करून ठेवितो. त्याचप्रमाणे येथील महाराष्ट्र बँकेतील श्री. पाठक यांनी बऱ्हाणपूर-दर्शन ' हे पुस्तक दिले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

परंतु ज्यांचा नामोल्लेख करता येत नाही किंबहुना तो केला जाऊ नये अशीच ज्यांची इच्छा आहे आणि ज्यांनी कसलीही अपेक्षा न करिता स्वतः मागे राहून माझा ग्रंथ पुढे यावा म्हणून परोपरीचे उत्तेजन दिले आणि मदत केली त्या

निर्हेतुक स्नेही सुहृदाचे ऋण कसे फिटावे ! ते ऋण कधीही फिटले जाणार नाही याचो मला पूर्ण जाणीव आहे. कारण पूर्वजन्मीचे ऋणानुबंध यालाच म्हणतात. तरीसुद्धा यश एकाचे असले तरी त्याचे श्रेय अनेकाचे असते, हे विसरता येणार नाही

असो. शेवटी इतकेच सांगायचे उरले की योगायोगाचा चमत्कार वाटल्याशिवाय राहात नाही. कारण या ग्रंथाचा विषय आहे, औरंगजेबाच्या आक्रमणाचा मराठ्यांनी केलेला प्रतिकार. या ग्रंथाचे प्रकाशन वर्ष आहे १९८१ की ज्या वर्षी औरंगजेबाच्या त्या ऐतिहासिक आक्रमणाला बरोबर तीनशे वर्षे पूर्ण होतात; या ग्रंथाचे प्रकाशन स्थळ आहे पुणे की जे पूर्वी मराठ्यांच्या पराक्रमाचे केंद्र होते व आज विद्येचे माहेरघर आहे व या ग्रंथाचे प्रकाशक आहेत श्री. शंकरराव दात्यांसारखे चारित्र्यसंपन्न देशभक्त ! हा सर्व दुर्लभ संगम पाहिला म्हणजे 'रत्नावली'त श्रीहर्षदेवाने म्हटल्याप्रमाणे म्हणावेसे वाटते की, 'यातली एक एक गोष्ट सुद्धा इच्छित फळ मिळवून देण्यास समर्थ आहे; येथे तर माझ्या भाग्यामुळे या सर्व गुणांचा गण एकत्र आलेला आहे, मग काय बोलायचे आहे ?

'वस्त्वैकमपीह वाञ्छितफलप्राप्तेः पदं किं पुनः ।
मद्भाग्योपचयादयं समुदितः सर्वो गुणानां गणः ।।'

जोशी बिल्डिंग
हनुमानवाडी, चाळिसगांव

# ऋणनिर्देश


1 History of Aurangzeb vol. I to V – J. N. Sarkar
2 Anecdotes of Aurangzeb – J. N. Sarkar
3 Rukait–I – Alamgiri
4 Storia de Mogal Vol. I and II – Manuchi
5 Travels in the Mogul Empire – Bernier
6 The First Nizam – Dr. Usuf Husain
७ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह – शं. ना. जोशी
८ शिवपुत्र संभाजी – डॉ. सौ. कमल गोखले
९ छत्रपति संभाजी महाराज – वा. सी. बेंद्रे
१० पोर्तुगीजांशी रणसंग्राम – शं. रा. देवळे
११. पोर्तुगेज–मराठे–संबंध – पिसुर्लेकर
१२ मराठ्यांचा इतिहास – करकरे
१३ विजापूरची आदिलशाही – वा. सी. बेंद्रे
१४ गोवळकोंड्याची कुतुबशाही – वा. सी. बेंद्रे
१५ मराठे व औरंगजेब – सेतुमाधवराव पगडी
१६ मोगल–मराठा संघर्ष – सेतुमाधवराव पगडी
१७ मोगल व मराठे – सेतुमाधवराव पगडी
१८ महाराष्ट्र व मराठे – सेतुमाधवराव पगडी
१९ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध – सेतुमाधवराव पगडी
२० श्रीछत्रपति व त्यांची प्रभावळ – सेतुमाधवराव पगडी
२१ छत्रपति राजाराम महाराज – वा. सी. बेंद्रे
२२ खंडो बल्लाळ –
२३ बाळाजी आवजी चिटणीस – प. रा. दाते
२४ करवीर रियासत – स. मा. गर्ग
२५ मराठ्यांचे सागरी प्रदेशावरील सीमोल्लंघन – डॉ. रवींद्र रामदास
२६ मोगल दरबारची बातमीपत्रे (नवभारत) – सेतुमाधवराव पगडी
२७ औरंगजेबाच्या दरबारचे अखबार–खंड १ – कुलकर्णी, खरे
२८ स्वराज्याचे तीन दुर्ग – ग. ह. खरे
२९ महाराणी ताराबाई – प्रा. जयसिंगराव पवार
३० ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ – आ. गं. पवार
३१ मराठेकालीन समाजदर्शन – शं. ना. जोशी

३२ मुसलमानी रियासत खंड १ व २ } गो. स. सरदेसाई
३३ मराठी रियासत – सर्व खंड
३४ ब्रिटिश रियासत पूर्वार्ध
३५ Tarabai and Her Times – Braj Kishor
३६ राजाराम चरितम् – वा. सी. बेंद्रे
३७ रायगडचो जीवनकथा - शां. वि. आवळसकर
३८ पन्हाळडगड
३९ संस्कृतिकोश–पं. महादेवशास्त्रीजोशी
४० बन्हाणपूर दर्शन
४१ श्रीशिवछत्रपति – त्र्यं. शं. शेजवलकर
४२ निजाम–पेशवे संबंध – त्र्यं. शं. शेजवलकर
४३ शेजवलकर लेखसंग्रह – त्र्यं. शं. शेजवलकर
४४ मराठ्यांच्या इतिहासाची साधने } स. शं. देसाई
पोर्तुगीज दप्तर खंड ३
आशिया विभाग खंड १ ते ५
४५ असे होते मोगल – चौबळ
४६ विजापूर वर्णन
४७ महाराष्ट्र दर्शन – गो. नी. दांडेकर
४८ दुर्गदर्शन – गो. नी. दांडेकर
४९ महाराष्ट्राची धारातीर्थे – महादेवशास्त्री जोशी
५० कर्नाटक – महादेवशास्त्री जोशी
५१ तामिळनाडु – महादेवशास्त्री जोशी
५२ स्वराज्यावरील संकट – नाथमाधव
५३ स्वराज्यातील दुफळी – नाथमाधव
५४ केवळ स्वराज्यासाठी – ह. ना. आपटे
५५ महापर्व – स. शं. देसाई
५६ शहेनशहा – ना. सं. इनामदार
५७ राजा शिवछत्रपति – ब. मो. पुरंदरे
५८ पुरंदऱ्यांची दौलत – ब. मो. पुरंदरे
५९ पुरंदऱ्यांची नौबत – ब. मो. पुरंदरे
६० हिंदवी स्वराज्य आणि मोगल – सेतुमाधवराव पगडी
६१ वाटचाल – रा. भि. जोशी
६२ सारा गावचं पाणी – वसंत बापट
६३ मजल दर मजल – रा. भि. जोशी
६४ भतावर भ्रमण – य. न. केळकर

६५ विशाखा – कुसुमाग्रज

६६ आज्ञापत्र – रामचंद्रपंत अमात्य

१ प्र. न. जोशी

२ वि. भि. कोलते

३ पांढरी पांडे

४ श्री. ना. बनहट्टी यांच्या आवृत्त्या

प्रसंगोपात्त उपयोगात आणलेली मासिके

(१) नवभारत

(२) इतिहास व संस्कृति

(३) निबंधसंग्रह (महाराष्ट्र इ. परिषद)

(४) भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक इ.

६७ संशोधन मुक्तावलि – वा. वि. मिराशी

६८ सभासद बखर

६९ चिटणीस बखर – संभाजी राजाराम चरित्र

७० चिटणीस बखर (शिवाजी)

७१ कळस – म. श्री. दीक्षित

७२ इतिहास–विचार–तरंग – दि. के. देशपांडे

७३ जीवनसेतु – सेतुमाधवराव पगडी

७४ स्वर्गनगरी (खुल्दाबाद) लेख – रा. भि. जोशी (किशोर, जानेवारी १९७५)

७५ श्रीसमर्थ चरित्र – स. खं. आळतेकर

७६ श्रीसमर्थचरित्र प्रथम खंड – शं. श्री. देव

श्रीसमर्थावतार

७७ मराठ्यांच्या राज्यकथा – गो. स. सरदेसाई

———

# विषयानुक्रम

## पूर्वार्ध

१. १–२३

छत्रपति शिवाजी महाराजांच्या निधनापूर्वीची परिस्थिति, शिवाजी संभाजी संघर्ष, संभाजीचे दिलेरखानाकडे प्रयाण, पुन्हा परत येणे, शिवाजी महाराजांचा त्यास उपदेश, पन्हाळ्यावर संभाजीस ठेवले. रायगडावर राजारामाचा व्रतबंध व विवाह, शिवाजी महाराजांचे देहावसान.

२. २४–३१

राजारामाला गादीवर बसविण्याचा कट, मंत्री त्यात सहभागी, राजारामाचे मंचकारोहण.

३. ३२–३७

संभाजीला कटाचा सुगावा, पन्हाळ्याहून रायगडावर प्रयाण, विरोधकांना कैद, १५ जणांना देहान्त प्रायश्चित्त.

४. ३८–५५

मंत्र्यांना कैद, संभाजीला राज्याभिषेक (१६–१–१६८१) कविकलशाचा संभाजीवर प्रभाव, शाक्त पंथाचे स्वरूप, शाहूचा जन्म.

५. ५६–६०

मराठी राज्याला जंजिऱ्याच्या सिद्दीचा उपद्रव, इंग्रज व सिद्दी यांच्याशी संघर्ष.

६. ६१–६९

मोगलांचा सुभेदार बहादुरखान याच्याशी लढा, औरंगबादवर मराठ्यांचा हल्ला व बुऱ्हाणपूरची लूट–अकबराचे संभाजीस पत्र.

७. ७०–८३

अकबर व औरंगजेब, औरंगजेब व राजपुत यांचा संघर्ष, हिंदूंची मंदिरे फोडण्याचा औरंगजेबाचा सपाटा, औरंगजेबाचा मुलगा अकबर याच्याशी रजपुतांनी संधान बांधले. औरंगजेबाविरुद्ध अकबराचे बंड अकबर मराठ्यांच्या आश्रयास येतो. कविकलश व संभाजीचे मराठी मंत्री यांच्यातील तेढ, संभाजीविरुद्ध कट, विषप्रयोगाचा प्रयत्न, मंत्र्यांना हत्तीच्या पायी दिले.

८. ८४–१०४

औरंगजेबाची दक्षिणेवर स्वारी (८–९–१६८१) अकबरास शरण येण्यासाठी औरंगजेबाचे पत्र व त्यास अकबराचे उत्तर–औरंगजेबाचे दक्षिणेकडे कूच.

९. १०५–१११

महाराष्ट्रावर मोगली संकट, समर्थांचा संभाजीस उपदेश–समर्थांचे देहावसान.

## उत्तरार्ध

१०. ११५–१२१

औरंगजेब बुऱ्हाणपूरला येतो, अकबराला पकडण्यासाठी प्रयत्न, सिद्दी व संभाजी यांचा संग्राम; मुंबईकर इंग्रजांचा सिद्दीस पाठिंबा, औरंगजेबाचा सेनापति हसन अलीखान याची कोकणावर स्वारी मराठ्यांच्या प्रतिकारामुळे हसन अलीखानाची पिछेहाट.

११. १२२–१२९

औरंगजेबाचे औरंगाबादेस प्रयाण, रामसेज किल्ल्याचा लढा, औरंगजेबाची सर्व बाजूंनी पिछेहाट, त्याने संतापाने किमॉश (शिरोभूषण) जमिनीवर आपटले व संभाजीला मारल्याखेरीज ते न घालण्याची शपथ घेतली ! संभाजीचे रामसिंगास पत्र, संभाजीचा धर्माभिमान.

१२. १३०–१३७

रणमस्तखानाची संभाजीवर स्वारी, शहाबुल्लाखानाची कोकणावर धाड, व त्याचा उडालेला बोजवारा, अकबराची नाकेबंदी करण्याचा प्रयत्न.

१३. १३८–१४९

संभाजी व पोर्तुगीज, गोव्यात औरंगजेबाचा वकील, पोर्तुगीजांची दाणादाण, संभाजीबरोबर तह, शहाअलम गोव्यात आला आणि गेला.

१४. १५०–१५९

रायगड घेण्याचा शहाबुद्दिनाचा प्रयत्न, मराठ्यांची वतनाची आसक्ति, औरंगजेबाची विजापूरवर स्वारी.

१५. १६०–१८१

विजापूरचा बादशहा सिकंदर आदिलशहा व मोगल यांचे युद्ध, गोवळकोंड्याच्या कुतुबशहाला औरंगजेबाची तंबी, हैदराबाद जिंकले, विजापूरच्या इस्लामी पंडितावरोबर औरंगजेबाची चर्चा, विजापूरचा पाडाव, गोवळकोंड्याचे मंत्री आकण्णा व मादण्णा यांचा शिरच्छेद, शिवाजीचे धोरण "दक्षिणचो पादशाही दक्षिणियांच्या हाती राहे ते करावे." गोवळकोंडाही फितुरीने पडला, शहाअलम याच्या गुप्त वाटाघाटी, त्याला कैद, औरंगजेब विजापूर सोडतो.

१६. १८२–२३२

अकबर व संभाजी परस्पर संबंध, अकबराचा इराणला जाण्याचा बेत, मराठी राज्यावर मोगली संकट, वतनासाठी धडपड, फितुरीने राज्य गेले, संभाजी, त्याचे मंत्री व कविकलश यांचे संबंध – शिर्के यांच्या साहाय्याने मुकर्रबखानाची संगमेश्वराकडे आडमार्गाने दौड,

बावीस

संगमेश्वरात असताना लोकांच्या तक्रारींचे संभाजीने केलेले निवाडे, हेरांच्या सूचनेकडे संभाजीचे दुर्लक्ष, कविकलश पूजेत गुंतले, मुकर्रबखानाने संभाजीस गाठले, चकमकीत संभाजीचे लोक मारले गेले, संभाजी व कविकलश देसायांच्या वाड्यात भुयारात लपले, तेथून मुकर्रबखानाच्या लोकांनी त्यास ओढून काढले व उंटावर बसवून संभाजीची धिंड काढली.

१७. २३३–२३८

औरंगजेबाच्या छावणीत संभाजी.

१८. २३९–२४८

संभाजीची अखेर, मूल्यमापन व समारोप.

# छत्रपति संभाजी

## (पूर्वार्ध)

(१३ नोव्हेंबर १६८१ ते ११ मार्च १६८९)

चालला पुढे तो काय ऐट, आनंद !
अग्नीचा ओघळ ओहळतो जणु मंद !
टाकली यमाने कटचार वा कनकाची
चालली बळीचा वेध घेत ती धुंद !

— कुसुमाग्रज
(अहि-नकुल)